# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएलच्या न.ता.वाडी आगारामध्ये आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- २२५ पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान.
- प्रत्येक महिन्यात एका आगारामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन.
- सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन.
- ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे उपचार करणाऱ्या सर्वसामान्य, गरीब, गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध होण्यासाठी उद्दात्त हेतूने आयोजन.
- परिवहन महामंडळाच्या मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांची संकल्पना.

महाराष्ट्र राज्यात दरवर्षी रक्ताचा तुटवडा भासतो ही बाब विचारात घेऊन पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांच्या संकल्पनेतून ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे उपचार करणाऱ्या सर्वसामान्य, गरीब, गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध होण्यासाठी उद्दात्त हेतूने व सामाजिक बांधिलकी म्हणून परिवहन महामंडळाच्या सर्व डेपो, दोन्ही मुख्यालये तसेच मुख्य प्रशासकीय कार्यालय येथे क्रमानुसार प्रत्येक महिन्यात एका ठिकाणी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.

परिवहन महामंडळाच्या न.ता.वाडी आगारामध्ये शुक्रवार, दि. १७/०१/२०२५ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य रक्तदान शिबिरात एकूण २२५ पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

पुणे व पिंपरी चिंचवड शहर, शहरांलगतची उपनगरे व पीएमआरडीए क्षेत्रात "लाईफलाइन" अशी ओळख असलेल्या पीएमपीएमएलने यापूर्वीही परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदानाचे आयोजन करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. पुणे व पिंपरी चिंचवड शहरवासियांप्रती असलेली सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा पीएमपीएमएलने जोपासली आहे.

सदर रक्तदान शिबीर यशस्वी होणेसाठी परिवहन महामंडळाचे मा. सहव्यवस्थापकीय संचालक श्री. नितीन नार्वेकर व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रज्ञा पवार-पोतदार यांचे मार्गदर्शनाखाली न.ता.वाडी आगाराचे आगार व्यवस्थापक श्री. संतोष किरवे, आगार अभियंता श्री. राजकुमार माने यांनी प्रयत्न केले यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने यांनी रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले.

---

दि.१७/०१/२०२५.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.